# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 4505/शि.वि./2015
दि. 09/06/2015

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथमिक/उच्च प्राथ./माध्य. शाळा,
म.न.पा.,नागपूर.

**विषयः– दि. 21 जून 2015 रोजी "आंतरराष्ट्रीय योग दिन" साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :– मा.आयुक्त, (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पूणे यांचे पत्र क्र. आयुक्त (शिक्षण) /योगदिन /2015 /क्र./1571 दि. 04.06.2015**

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, दि. 21 जून 2015 रोजी **"आंतरराष्ट्रीय योग दिन"** संपुर्ण जगात साजरा करण्यात येणार आहे. ही आपल्याकरीता अभिमानाची बाब असून संपुर्ण मनपा शाळेमध्ये या दिवशी "आंतरराष्ट्रीय योग दिन" उत्साहाने साजरा करावयाचे आहे. ग्रीष्मकालीन सुट्टया असल्यातरी संपूर्ण विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात सहभागी करायचे आहे. तरी या कार्यक्रमाला आताच पूर्व नियोजन करून संपूर्ण विद्यार्थी, शिक्षक व पालकांना याबाबत सूचना द्याव्यात.

राज्यात सर्वत्र दि. 21 जून 2015 रोजी सकाळी 7.00 ते 7.33 या वेळेत योगदिन साजरा होणार आहे. या निमीत्ताने सर्व शाळांमध्ये **"योग महोत्सव"** साजरा करावयाचा आहे. या दिवशी दिवसभर विद्यार्थ्यांच्या निबंध स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, चित्रकला स्पर्धा यांचे आयोजन करावे. स्वंयसेवा संस्थांच्या मदतीने योगविषयक साहित्याची प्रदर्शने भरविण्यात यावी. परीसरातील योगतज्ञ/योगशिक्षक यांची कार्यक्रमाच्या आयोजनात मदत घ्यावी. या कार्यक्रमात शाळा सुधार समिती, नगरसेवक, प्रतिष्ठीत नागरीक व पालकांनासुध्दा सहभागी करावे. शक्य तो कार्यक्रम खुल्या मैदानात आयोजित करावा. पाऊस आल्यास वर्ग, हॉल व व्हरांडा इत्यादीचा वापर करावा. अधिक माहितीसाठी आपल्या झोनच्या शाळा निरीक्षकांशी संपर्क साधावा. कार्यक्रमानंतरचा कार्यपालन अहवाल शाळा निरीक्षक यांना सादर करावा.

**शिक्षणाधिकारी**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर.**

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT